।। श्रम ही आराधना ।।

# महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघ

(संलग्न भारतीय मजदूर संघ) (र.नं.पी.एन.३९७८)

| निलेश खरात | सचिन मेंगाळे | उमेश आणेराव | राहुल बोडके | सागर पवार |
|---|---|---|---|---|
| अध्यक्ष | सरचिटणीस | कार्याध्यक्ष | संघटन मंत्री | कोषाध्यक्ष |
| मो.: ९८२२४१८३९५ | मो.: ९४२२०३७०२९ | मो.: ९९७०००४४७४ | मो.: ९५५२८७४८२१ | मो.: ९८९०१६९६६७ |

● mvkksangh@gmail.com ● विश्वकर्मा भवन, १८५, शनिवार पेठ, पुणे - ४११०३० ● www.mvkksangh.com

एमव्हीकेकेसंघ/मंत्रालय/किमान वेतन/२०१९/388A दि : ११-०६-२०१९

मुख्यमंत्री सचिवालय
महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक 11/6/19

लिपिक 11/6/2019
उद्योग, ऊर्जा व कामगार
विभाग
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

प्रति,

(१) मा. मुख्यमंत्री
महाराष्ट्र राज्य, मंत्रालय
मुंबई-४०००३२.

(२) मा. ऊर्जामंत्री
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

(३) मा.अर्थमंत्री
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

(४) मा.कामगार मंत्री
महाराष्ट्र राज्य, मंत्रालय
मुंबई.

मंत्री, ऊर्जा, नवीन व नवीकरणीय ऊर्जा
राज्य उत्पादन शुल्क यांचे कार्यालय
महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई ४

लिपिक 11/6/19
मंत्री, कामगार, भूकंप पुनर्वसन
... विकास व उद्योजकता
... कल्याण
महाराष्ट्र शासन
... ०३२

**विषय** : अस्तित्वात असलेल्या किमान वेतनाचे सिंहावलोकन करून त्यात सुधारणा करण्यात अक्षम्य दिरंगाई होत असल्याबाबत.

महोदय,

किमान वेतन कायदा १९४८ अंतर्गत महाराष्ट्र राज्यात सुमारे ६७ उद्योग समाविष्ट आहेत. सदर उद्योगातील कामगारांसाठी किमान वेतन निर्धारीत करणे व त्याचे सिंहावलोकन करून त्या सुधारणा करणे ही जबाबदारी शासनाची आहे.

कामगारांच्या किमान मुलभूत गरजा भागवणारे किंवा त्याच्या आसपास जाणारे किमान वेतन ज्या उद्योगांना सामुहिक सौदेबाजी करणे अशक्य असते. त्यामुळे या उद्योगातील कामगारांचे कमीत कमी आर्थिक शोषण व्हावे व त्यांना अन्न, वस्त्र व निवारा यांची गरज भागवता यावी म्हणून शासन किमान वेतन घोषित करते. त्यामुळे ही जबाबदारी निर्धारित वेळेत पार पाडणे हे शासनाचे कर्तव्य आहे.

प्राप्त 11/06/19
कामगार आयुक्त कार्यालय
कामगार भवन, बांद्रा कुर्ला संकुल
ई-ब्लॉक, प्लॉट नं. सी-२०
बांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१

किमान वेतन कायद्याच्या कलम ३ प्रमाणे शासन किमान वेतन निर्धारित करते. कलम ३(बी) प्रमाणे निर्धारित केलेल्या किमान वेतनाचे सिंहावलोकन ५ वर्षाच्या आत करून त्यात सुधारणा करणे अपेक्षित आहे.

असे लक्षात आले आहे की ३० पेक्षा जास्त उद्योगांचे किमान वेतन निर्धारीत होऊन ५ वर्षापेक्षा जास्त कालावधी लोटला आहे. तरीही सदर उद्योगांना किमान वेतनाचे सिंहावलोकन होवून सुधारीत वेतन लागू झालेले नाही.

शासनातील दफ्तर दिरंगाई, निवडणुका व आचारसंहिता यामुळे किमान वेतन सुधारणा कार्यक्रम मागे राहिला आहे. हा कार्यक्रम वेळेत बसवला नाही व त्या कामात कार्यक्षमता व गती आणली नाही तर किमान वेतन सुधारणा २०१९ सालात होणे अशक्य आहे. यामुळे कामगारांचे प्रचंड प्रमाणात आर्थिक नुकसान होत आहे व यामुळे कामगारांच्या मनात असंतोष निर्माण झाला आहे.

वरील मुद्यांच्या अनुषंगाने आमची मागणी की,

(१) किमान वेतन कायदा कलम ३(बी) प्रमाणे ज्या उद्योगातील किमान वेतन घोषित होवून ५ वर्षे होऊन गेली आहेत. त्यांचे सिंहावलोकन तातडीने करून सर्व कायदेशीर प्रक्रिया विनाविलंब पूर्ण करून सुधारीत किमान वेतन त्वरीत घोषित करावे.

(२) जी किमान घोषित होवून ४ वर्षांपेक्षा जास्त काळ लोटला आहे त्यांची सुधारणा करण्याचा कार्यक्रम तातडीने हाती घ्यावा.

(३) सुधारीत किमान वेतन मागपासून लागू करावे अथवा आजपर्यंत झालेले नुकसान भरून येईल एवढी वाढ करावी.

जीवनावश्यक वस्तु व सेवांचे वाढणारे भाव (बाजार किंमत) कामगारांच्या बदलणाऱ्या गरजा यांचा विचार करून तुटपुंजे असलेले किमान वेतन तातडीने वाढवावे.

धन्यवाद.

आपला विश्वासू

( सचिन मेंगाळे )
सरचिटणीस

महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघ
नोंदणी क्र.
पी.एन./३९७८

**<u>प्रत</u>**

(१) मा.प्रधान सचिव, कामगार, मुंबई.

(२) मा.कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

(३) मा.अध्यक्ष, किमान वेतन सल्लागार मंडळ
महाराष्ट्र राज्य